

# 'दिलासा' - स्त्री अत्याचार निवारण विभाग

कभी हाथ-पैर पर गहरी चोट लगने पर या कभी जल जाने पर, आप अस्पताल में इलाज के लिये आती हैं। कभी कभी इन सबसे परे घर में खाना न मिलना, घर के लोगों का दिल को चोट पहुँचानेवाला बर्ताव, जिससे मन बेहाल हो जाता है, बिना वजह नींद उड़ जाती है, हमेशा चक्कर आते रहते हैं, आपके माहवारी से जुड़ी तकलीफें और ऐसी कई, छोटी शिकायतें भी होती रहती हैं। कभी कभी मायूसी इतनी बढ़ जाती है कि जिंदगी खत्म करने का खयाल मन में आता है।

इन सब शिकायतों के लिये आप अस्पताल आती हैं। केसपेपर बनाते वक्त कारण पूछे जानेपर कुछ बहनें 'आदमी ने मारा', ऐसा बताती हैं। उसके पहले कुछ पुलिस स्टेशन भी जा चुकी होती हैं। लेकिन ज्यादातर औरतें पति का नाम या पिहरके लोगों का नाम लेने से कतराती हैं। ससुरालवालों ने, घर के लोगों ने उसकी यह हालत की है ये कहने से हिचकिचाती हैं। हादसे से हो गया यूँ, कह डालती हैं।

लेकिन अब आप के दर्द को बाँटने के लिये 'दिलासा' के रुप में भाभा अस्पताल में जगह बनाई गई है। यह विभाग 'के.बी. भाभा अस्पताल' और 'सेहत' की साझीदारी से शुरु किया गया है। यहाँ आप से बात करने के लिये, बुरे हालातों से राह निकालने के लिये संवेदनशील, तजुर्बेकार और जानकार लोग मौजूद हैं। यहाँ उनसे सलाह, मशवरे के सिवाय वकील की सलाह, पुलिस की मदद, जरुरत पड़नेपर १ - २ दिन के रहने का इंतजाम 'दिलासा' से हासिल होगा। यहाँ आपको सरकार की ओर से बनाये गये नये कानून के बारे में जानकारी भी मिल सकती है।

लड़कियाँ और औरतों पर होनेवाली घरेलू हिंसा को रोकने के लिये भारत सरकार ने **'घरेलू हिंसा से महिला संरक्षण अधिनियम - २००५'** कानून लागू किया है। हर धर्म और जाति की महिला इस कानून का सहारा ले सकती है। ससुराल-मायका एवं करीबी रिश्तेदारों की ओर से अगर हिंसा हो रही हो, तो भी इस कानून की मदद ले सकती हैं। कभी हिंसा इतनी ज्यादा होती है कि हमें खुद कानून की मदद लेने की हिम्मत नहीं होती, ऐसे में कोई और भी आपकी ओर से इस कानून की मदद माँग सकता है। कई बार महिलाओं को डर रहता है कि यदि वे हिंसा का विरोध करेंगी, तो उनको घर से निकाल दिया जाएगा। लेकिन इस कानून के अनुसार कारवाई करके अपने घर में सुरक्षित रहने का आपका अधिकार बरकरार रहेगा ।

हर किसी को हिंसा से, मारपीट से मुक्त ज़िंदगी की चाहत रहती है। इसी को हासिल करने के लिये 'दिलासा' कोशिश कर रहा है। 'किसी भी व्यक्ति को दूसरे व्यक्ति पर हिंसा करने का हक नहीं' यही 'दिलासा' का उसूल है। 'दिलासा' में आप के अकेलेपन को कम करके आप को जीने का हौसला मिले, यही 'दिलासा' का मकसद है।


विभाग क्र. १०१, गायनॅक ओ.पी.डी., के.बी.भाभा अस्पताल, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५०.

समय : सोम. से शुक्र. सु. ९:०० से शाम. ४:००, शनि. सु. ९:०० से दोपहर. १२:००

फोन (डायरेक्ट) : २६४००२२९ भाभा : २६४२ २७७५ / २६४२२५४१ विस्तार : ४३७६



# 'दिलासा' - स्त्री अत्याचार निवारण विभाग

कधी हातापायाला जबर दुखापत झाली म्हणून, मुका मार लागला म्हणून किंवा कधी भाजले म्हणून तुम्ही दवाखान्यात येता. काही वेळा कोणतीच शारीरिक दुखापत नसते, पण घरात खाण्या-पिण्याची आबाळ होते, घरातील माणसे नीट बोलत नाहीत, मग मानसिक ताण येतो. साहजिकच झोप न येणे, सतत चक्कर येणे, मासिक पाळीच्या वेळी त्रास होणे अशा तक्रारी सुरु होतात. काही वेळा गोष्टी इतक्या असह्य होतात की जीवनाचा शेवटही करावासा वाटतो.

या सर्वांसाठी तुम्ही जेव्हा दवाखान्यात येता, तेव्हा केस पेपर काढताना तुम्हाला कारणं विचारली जातात. काही जणी 'नवऱ्याने मारले' असे सांगतात, त्या आधी काही जणी पोलिस स्टेशनमध्येही गेलेल्या असतात. पण बऱ्याच जणींचे मन 'नवऱ्याने मारले' - 'माहेरच्यांनी मारले' असे सांगताना कचरते. सासरच्यांनी, घरातल्यांनी कोंडमारा केला असे सांगण्यास त्या धजावत नाहीत. 'अपघाताने असे झाले' असे सांगतात.

आता मात्र आपल्या दु:खाला वाट मोकळी करुन देण्यासाठी 'दिलासा' विभागाच्या रुपात भाभा हॉस्पिटलमध्ये एक जागा साकारली आहे. हा विभाग 'के.बी. भाभा हॉस्पिटल' आणि 'सेहत' यांच्या संयुक्त विद्यमाने साकार झाला आहे. 'दिलासा' म्हणजे आधार. दिलासात येऊन तुम्ही आपली खरी समस्या मांडू शकता. येथे तुमच्याशी बोलायला, कठीण परिस्थितीतून वाट काढायला संवेदनशील, अनुभवी जाणकार असतील. तुम्हाला त्यांचा सल्ला मिळेल. याशिवाय, वकिली सल्ला, पोलिसांची मदत व प्रसंगी एक-दोन दिवसाचा तात्पुरता निवारा यासाठीही 'दिलासा' मदत करेल. याच्या जोडीला सरकारने नव्याने केलेल्या कायद्याची माहिती आपल्याला दिलासामध्ये मिळू शकेल.

मुली व स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसा रोखण्यासाठी भारत सरकारने **'कौटुंबिक हिंसेविरोधी स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा २००५'** अंमलात आणला आहे. तुम्ही कोणत्याही जाती-धर्माच्या असलात तरी तुम्हाला या कायद्याअंतर्गत मदत मिळू शकते. तुमच्यावर सासर-माहेर किंवा इतर जवळचे नातेसंबंध असणाऱ्यांकडून जर हिंसा होत असेल तर तुम्ही या कायद्याची मदत घेऊ शकता. कधी कधी परिस्थिती इतकी बिकट असते की तुम्ही स्वत: दाद मागू शकत नाही तेव्हा इतर कोणीही तुमच्या बाजूने ह्या कायद्याद्वारे दाद मागू शकतात. बऱ्याचदा स्त्रियांना मुख्य भीती असते की, आपल्यावर होणाऱ्या हिंसेविरुद्ध बोलल्यास आपल्या डोक्यावरचे छप्पर जाईल परंतु या कायद्याची मदत घेऊन तुम्ही त्याच घरात राहून तुमच्यावर होणाऱ्या हिंसेला प्रतिबध्द करु शकता. आता आपले हात बळकट झाले आहेत कारण या कायद्याचे पाठबळ आपल्याला मिळाले आहे.

प्रत्येकीला हिंसेपासून,मारझोडीपासून, त्रासापासून मुक्त कुटुंब हवे आहे. त्यासाठी 'दिलासा' प्रयत्न करत आहे. 'कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर हिंसा करण्याचा अधिकार नाही' हेच दिलासाचे ब्रीद आहे. दिलासात आल्याने एकटेपण कमी होऊन तुमचा जगण्याचा आत्मविश्वास वाढावा, यासाठी हा विभाग तत्पर आहे.


विभाग क्र. १०१, गायनॅक ओ.पी.डी., के.बी. भाभा हॉस्पिटल, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५०.

वेळ : सोम. ते शुक्र. स. ९:०० ते संध्या. ४:००, शनि. स. ९:०० ते दुपारी १२:००

फोन (डायरेक्ट) : २६४० ०२२९ भाभा : २६४२ २७७५ / २६४२२५४१ विस्तार : ४३७६